# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि.
# कोकण परिमंडळ कार्यालय
# ग्राहक तक्रार निवारण मंच रत्नागिरी

---

ग्राहक तक्रार क्र. २३/२०१४ दि. १८.०९.२०१४

| | |
|---|---|
| श्री.वसंत दत्तात्रय सोमण<br>घर नं.३७, "दत्तगंगा" बापट आळी<br>ता.चिपळूण, जिं.रत्नागिरी | तक्रारदार ग्राहक |

विरुध्द

| | |
|---|---|
| कार्यकारी अभियंता, महावितरण<br>विभागीय कार्यालय चिपळूण | विरुध्द पक्षकार |
| फोरम उपस्थिती | १) श्री. डी. एस्. जामखेडकर,<br>अध्यक्ष<br>२) श्री. व्ही. बी. जगताप,<br>सचिव तथा कार्यकारी अभियंता<br>३) श्री. ज. पु. बिवलकर<br>सदस्य |
| ग्राहकाच्या वतीने | १) श्री. संतोष गजानन सोमण |
| विरुध्द पक्षकाराच्या वतीने | १) श्री. मकरंद देवेंद्र आवळेकर<br>कार्यकारी अभियंता, चिपळूण<br>२) श्री. युवराज गोपाळ पाटील<br>अतिरिक्त कार्यकारी अभियंता |

**महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोग, ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल (ओम्बुडस्मन) विनियम २००६ मधील ८(२) चे तरतुदीनुसार :**

श्री. वसंत दत्तात्रय सोमण, ३७, "दत्तगंगा" बापट आळी, मु. पो. ता.चिपळूण, जि.रत्नागिरी यानी त्यांचे घराचा वीज पुरवठा महावितरणकडून कोणतेही संयुक्तीक कारण न देता खंडीत केल्याबाबत तसेच वीज पुरवठा बंद असताना देखील डिसेंबर २०१३ पासून वीज आकारणी केल्याबाबतची तक्रार फॉर्म 'अ' मध्ये दि.१८.०९.२०१४ रोजी मंचाकडे दाखल केलेली आहे. तक्रार प्राप्त होताच मंचाकडील पत्र क्रं. १४१ दि.१८.०९.२०१४ अन्वये कार्यकारी अभियंता चिपळूण यांचेकडे स्पष्टीकरण मागविणेत आले. महावितरणकडून देखील त्यांचे पत्र क्रं. ३७४७ दि.०४.१०.२०१४ अन्वये स्पष्टीकरण सादर करण्यात आले. त्यानंतर अधिनियमामधील तरतुदीनुसार उभयपक्षाना नोटीस काढून दि.०७.१०.२०१४ रोजी सुनावणीची प्रक्रिया पुर्ण करण्यात आली.

तक्रारदाराच्या तक्रारीचे स्वरुप असे की, श्री वसंत सोमण यांचे वरील पत्त्यावर घर असून ते औषधोपचारासाठी पुण्याला गेले होते दरम्यानच्या काळात त्यांचे घराचा वीजपुरवठा महावितरणकडून बंद करण्यात आला आहे. परत आल्यानंतर त्यानी शेजारी चौकशी केली असता घराशेजारील झाड तोडणेकरीता हा वीजपुरवठा खंडीत केल्याचे समजले याबाबतीमध्ये त्यानी महावितरणच्या स्थानिक कार्यालयात तक्रार अर्ज दाखल केला, तक्रार नोंद वहीमध्ये तक्रार नोंद केली पण वीज पुरवठा सुरु करणेत आला नाही असे असूनही वीज पुरवठा बंद असून देखील त्याना वीजेची बीले मात्र येत होती त्यामुळे बंद करणेत आलेला वीजपुरवठा पुन्हा सुरु करुन देणेत यावा वीज पुरवठा बंद असताना देणेत आलेली वीज बीले रद्द करण्यात यावीत, महावितरणच्या जबाबदार अधिकाऱ्यावर कार्यवाही करावी तसेच झालेल्या मानसिक त्रासाबद्दल रु.५०,०००/- नुकसान भरपाई मिळावी अशी त्यानी आपल्या अर्जामध्ये विनंती केली आहे.

महावितरणकडून दाखल करण्यात आलेल्या स्पष्टीकरणामध्ये नमुद करण्यात आले आहे की, त्यांचे घराशेजारी धोकादायक झाड तोडणे करीता वीज पुरवठा बंद करण्यात आलेला असून त्यांचे घर बंद असल्यामुळे त्यांच्याशी संपर्क साधता आला नाही. धोकादायक झाड हे श्री जोगळेकर यांच्या विनंतीनुसार तोडण्यात आले असून सदर झाड तोडणेकरीता दोन ते तीन महीन्याचा कालावधी लागलेला आहे तसेच श्री सोमण यांचे घर देखील बंदच होते त्यामुळे वीज पुरवठा सुरु करणेत आला नाही. याची कल्पना श्री सोमण यांचे शेजारी श्री जोगळेकर याना देणेत आलेली आहे. या काळात त्यांचे घर बंद होते व मीटर घरामध्येच होता त्यामुळे किमान आकाराची वीज देयके देण्यात आली असून ती नियमानुसार बरोबर आहेत. दरम्यानच्या काळात दि.२४.०९.२०१४ रोजी हा वीजपुरवठा सुरु करण्यात आलेला आहे. श्री सोमण यांचा वीजपुरवठा अपघात होऊन कोणतीही वित्त व जीवित हानी होऊ नये यासाठीच बंद करणेत आलेला होता यामध्ये ग्राहकास कोणत्याही प्रकारे जाणीवपुर्वक त्रास देण्याचा उद्देश नव्हता असे स्पष्ट करण्यात आले असून मंचानी या बाबींचा विचार करुन निर्णय देण्याबाबत विनंती करण्यात आली आहे.

दि.०७.१०.२०१४ रोजी घेण्यात आलेल्या सुनावणीसाठी ग्राहकाच्या वतीने श्री संतोष गजानन सोमण व महावितरणकडून श्री आवळेकर कार्यकारी अभियंता उपस्थित होते. सुनावणीच्या सुरुवातीसच मंचाकडून ग्राहक प्रतिनिधी श्री संतोष सोमण हे अधिवक्ता असल्यामुळे त्याना सुनावणीत सहभागी होता येणार नाही असे सांगणेत आले., तसेच त्याना ग्राहक प्रतिनिधी म्हणून

महाराष्ट्र वीज नियामक आयोगाच्या तरतुदींच्या अधिन राहून दुसऱ्या व्यक्तींच्या नांवे अधिकारपत्र अथवा ग्राहक स्वतः उपस्थित रहाणार असल्यास तसे लेखी निवेदन दि.१४.१०.२०१४ पर्यन्त सादर करण्याबाबत सुचना देणेत आली.

दि. १४.१०.२०१४ पर्यंत ग्राहकाकडून असा कोणताही पत्र व्यवहार सादर न झाल्याने मंचाकडून ही तक्रार निकाली काढणेचा निर्णय घेण्यात आला.

# आदेश

**१) ग्राहकाची तक्रार निकाली काढणेत येत आहे .**

**२) या आदेशाविरुध्द अर्जदारास अपील करावयाचे असल्यास खालील पत्त्यावर हा आदेश मिळाल्यापासून ६० दिवसात अपील दाखल करता येईल.**

**पत्ता :- सचिव,**
**विद्युत लोकपाल,**
**महाराष्ट्र विदयुत नियामक आयोग,**
**६०६/६०८, केशवा,**
**बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, मुबंई ४०००५१.**
**फोन नं. ०२२- २६५९२९६५**

| | | |
|---|---|---|
| **श्री. डी. एस्. जामखेडकर** | **श्री. व्हि.बी.जगताप** | **श्री.ज.पु.बिवलकर** |
| **अध्यक्ष** | **सचिव / कार्यकारी अभियंता** | **सदस्य** |
| **ग्रातनिमं, कोकण परिमंडल** | **ग्रातनिमं, कोकण परिमंडल** | **ग्रातनिमं, कोकण परिमंडल** |

**दिनांक :- १७.१०.२०१४**
**ठिकाण :- रत्नागिरी.**